19

# कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींचा अभ्यास

**प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

***********

**प्रस्तावना**

भारतीय संविधानातील कलम ३३० नुसार लोकसभेत अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुसूचित जाती व जमाती यांच्या लोकसंख्येप्रमाणे राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही ७३ व्या घटना दुरूस्ती १९९३ साली संमत करण्यात आली. या घटनेनुसार अनुसूचित जातीतील पुरूष व महिला यांच्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात असलेल्या राखीव जागेतील ५० टक्के जागा स्त्रीयांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार ओबीसी स्त्री आणि पुरूष यांच्यासाठी २७ टक्के आरक्षण ठेवण्यात आले. खुल्या गटातील महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतुद करण्यात आलेली आहे. या घटनादुरूस्ती पूर्वी महाराष्ट्रात ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले होते. सध्या महाराष्ट्रात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण सुरू आहे. अनुसूचित जातीसाठी ७३ व्या घटनादुरूस्तीने प्राप्त झालेल्या आरक्षणाने अनुसूचित जातीतील कोल्हापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय दर्जा व सहभाग हा संशोधनाचा मुख्य विषय आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१) कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

२) कोल्हापूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीअंतर्गत प्राप्त झालेल्या प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करणे.

३) अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा अभ्यास करणे.

**गृहितके**

१) कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थिती सुधारलेली आहे.

२) अनुसूचित जातीतील सर्व जातींना स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधीत्व प्राप्त झालेले आहे.

३) अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा स्थानिक स्वराज्य संस्थेतील निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधी पुरती मर्यादीत आहे. हा अभ्यास कोल्हापूर जिल्ह्यातील ६० गावांपुरता मर्यादीत आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

प्रस्तुत संशोधनात अनुसूचित जातीतील ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य इत्यादींचा समावेश आहे. ७३ व्या घटना दुरूस्तीनंतरच्या अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींचा अभ्यास केला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी प्राथमिक स्त्रोतातील मुलाखत अनुसूची पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या साठ गावातील लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. दुय्यम साधनांमध्ये संदर्भग्रंथ, पुस्तके, जनगणना अहवाल, गॅझीटेयर, शासकीय अहवाल इत्यादींचा वापर केला आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील**



Principal
Shivraj College of Arts, Commerce,
& D.S.Kadam Science College,
Gadhinglaj.(Dist. Kolhapur)

**लोकप्रतिनिधी**

प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिर्धीचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. यावरून त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास केलेला आहे.

**तक्ता क्र. १**

**प्रस्तुत संशोधनात तालुकानिहाय मुलाखती घेतलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या**

| अ.क्र. | तालुका | वरंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | करवीर | १३ | ९.८ |
| २ | हातकणंगले | ८ | ६.० |
| ३ | शिरोळ | ७ | ५.३ |
| ४ | कागल | ११ | ८.३ |
| ५ | पन्हाळा | १५ | ११.३ |
| ६ | गडहिंग्लज | ११ | ८.३ |
| ७ | राधानगरी | १४ | १०.५ |
| ८ | चंदगड | १६ | १२.० |
| ९ | शाहूवाडी | १३ | ९.८ |
| १० | भुदरगड | १० | ७.५ |
| ११ | आजरा | १० | ७.५ |
| १२ | गगनबावडा | ५ | ३.८ |

कोल्हापूर जिल्ह्यातील ६० गावातील एकूण १२९ लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. यामध्ये सर्वात अधिक लोकप्रतिधींची संख्या ही चंदगड तालुक्याची आहे. याचे शेकडा प्रमाण १२ टक्के इतके आहे. सर्वात कमी लोकप्रतिनिधींची संख्या गगनबावडा तालुक्याची आहे. याचे शेकडा प्रमाण ३. ०८ इतके आहे. संशोधकाने गावांची निवड करत असताना ५ टक्के प्रमाणे केलेली आहे. त्यामुळे एकूण गावाच्या ५ टक्के इतकी संख्या असल्याने प्रत्येक तालुक्यातील संख्या ही एकसारखी दिसत नाही.

**ग्रामीण लोकप्रतिनिधींचे लिंगभेदानुसार वर्गीकरण**

प्रस्तुत संशोधनात स्त्री आणि पुरूष अशा लोकप्रतिनिधींच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करण्यासाठी स्त्री आणि पुरूष प्रतिनिधींची संख्या खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**तक्ता क्र. २**

**ग्रामीण लोकप्रतिनिधींचे लिंगभेदानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | लिंग | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | ६५ | ५०.३८ |
| २ | स्त्रिया | ६४ | ४९.६१ |
| | एकूण | १२९ | १०० |

तक्ता क्र. २ मधील लिंगभेदाच्या वर्गीकरणामध्ये अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींच्या पुरूषांची संख्या ५०.३८ टक्के आहे आणि स्त्रियांची अनुसूचित जातीतील महिलांची संख्या ४९.६१ टक्के आहे. यामध्ये काही अनुसूचित जातीतील पुरूष खुल्या गटातून पण निवडून आलेले आहेत. ज्या गावात अनुसूचित जातीची संख्या अधिक आहे अशा गावात अनुसूचित जातीचे प्रतिनिधी खुल्या गटातून निवडून आलेले दिसतात. ७३ व्या घटना दुरूस्तीमुळे अनुसूचित जातीतील महिलांचे प्रतिनिधीत्व ५० टक्के असलेले दिसते. यापूर्वी महिलांना इतकी राजकीय प्रतिनिधीत्वाची संधी मिळत नव्हती. यामुळे महिलांचा आणि अनुसूचित जातीतील पुरूषांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय सहभाग वाढला आहे.

**तक्ता क्र. ३**

**अनुसूचित जातीअंतर्गत प्रतिनिधीत्व**

| अ. क्र. | जात | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नवबौद्ध (पूर्वाश्रमीचे महार) | ९६ | ७४.०० |
| २ | मातंग | २३ | १७.८२ |
| ३ | चर्मकार | ०९ | ६.९७ |
| ४ | ढोर | १ | ०.७७ |
| | एकूण | १२९ | १००.०० |

तक्ता क्र. ३ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ६० गावांतील स्थानिक स्वराज्य संस्थेतील जातीअंतर्गत निवडलेल्या प्रतिनिधीत्वाच्या संख्येत सर्वात अधिक संख्या नवबौद्ध समाजाची आहे. या समाजाचे ९६ प्रतिनिधी आहेत. याचे शेकडा प्रमाण ७४ टक्के आहे. जिल्ह्यात अनुसूचित जातीतील सर्वात अधिक लोकसंख्या नवबौद्ध समाजाची आहे. त्यामुळे या समाजाला जातीअंतर्गत अधिक प्रतिनिधीत्व मिळालेले दिसते. याचबरोबर गावातील स्थानिक आघाडीत नवबौद्ध समाज सहभागी असल्याने प्रतिनिधीत्वाची संख्या अधिक दिसते. मातंग समाजाचे २३ प्रतिनिधींची संख्या मुलाखतीसाठी उपलब्ध झालेली आहे. त्यांची टक्केवारी १७.८२ इतकी आहे. या समाजाची लोकसंख्या दुसऱ्या स्थानी आहे. चर्मकार समाज व ढोर समाज संख्येने अल्प व सर्व गावांत आढळून येत नाही त्यामुळे त्यांच्या प्रतिनिधीत्वाची संख्या कमी असलेली दिसते. परंतु ७३ व्या घटना दुरूस्तीने अनुसूचित जातीला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळालेले दिसते.

**तक्ता क्र. ४**

**लोकप्रतिनिधींच्या शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण**

| अ. क्र. | शैक्षणिक स्तर | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ३ | २.३२ |
| २ | प्राथमिक | ४३ | ३३.३३ |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक | ६० | ४६.५१ |
| ४ | पदवी | १६ | १२.४० |
| ५ | पदव्युत्तर | ४ | ३.१० |
| ६ | संशोधन स्तर | ३ | २.३२ |
| | एकूण | १२९ | १००.०० |

तक्ता क्र. ४ मध्ये १२९ लोकप्रतिनिधींपैकी ६० लोकप्रतिनिधींनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. याचे शेकडा प्रमाण ४६.५१ टक्के इतके आहे. सर्वात कमी स्तर हा संशोधन स्तर आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक पात्रता असलेल्या प्रतिनिधींची संख्या वाढलेली आहे. त्याचे कारण असे दिसून येते की, ग्रामीण भागामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय झालेली दिसते. त्याचबरोबर ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झालेला आढळून येतो. या शैक्षणिक पात्रतेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थेतील कारभारात बहुतांश ठिकाणी पारदर्शकता व कार्यक्षमता वाढलेली दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये संशोधन स्तरावरील प्रतिनिधींची संख्या कमी दिसते. या स्तरातील लोकांची संख्या कमी आहे. याचबरोबर या स्तरातील व्यक्तींची स्थानिक राजकारणामध्ये सहभागी होण्याची मानसिकता दिसत नाही.

**तक्ता क्र. ५**

**स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींचे पदानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | पद | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत सदस्य | ७० | ५४.२६ |
| २ | उपसरपंच | १४ | १०.८५ |
| ३ | सरपंच | ४२ | ३२.५५ |
| ४ | पंचायत समिती सदस्य | १ | ०.७७ |
| ५ | समाजकल्याण सभापती | १ | ०.७७ |
| ६ | जिल्हा परिषद सभापती | १ | ०.७७ |
| | एकूण | १२९ | १०० |

तक्ता क्र. ५ मध्ये सर्वात अधिक लोक प्रतिनिधींची संख्या ग्रामपंचायत सदस्यांची आहे. याचे शेकडा प्रमाण ५४.२६ इतके आहे. मुलाखतीसाठी सर्वात कमी लोकप्रतिनिधींची संख्या ही पंचायत समिती सदस्य, समाजकल्याण सभापती आणि जिल्हा परिषद सभापती यांची आहे. पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांची संख्या अनुसूचित जातीतील लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा आहेत. परंतु मुलाखतीसाठी उपलब्ध संख्या कमी आहे. ग्रामपंचायती मध्ये अनुसूचित जातीची सदस्य संख्या अधिक आहे. कारण ६० गावातील आरक्षित वार्डांची संख्या ही अधिक आहे. परंतु कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील मुदाळ या गावात अभ्यासावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायतीमध्ये राजकीय आरक्षण असल्याचे दिसून आले नाही. दुसरे गाव आजरा तालुक्यातील उत्तूर या गावी अनुसूचित जातीतील संशोधनाच्या वेळेपर्यंत सरपंच पद अनुसूचित जातीला मिळालेले दिसून आले नाही.

**तक्ता क्र. ६**

**स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींचे व्यवसायानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | व्यवसायाचे स्वरूप | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | १६ | १२.४० |
| २ | शेती | ६७ | ५१.९३ |
| ३ | स्वयंरोजगार | २२ | १७.०५ |
| ४ | मजूर | ५ | ३.८७ |
| ५ | शिक्षण | १ | ०.७७ |
| ६ | गृहिणी | १८ | १३.९५ |
| | एकूण | १२९ | १०० |

तक्ता क्र. ६ मध्ये सर्वात अधिक लोक प्रतिनिधी शेती हा व्यवसाय करताना दिसतात. याचे शेकडा प्रमाण ५१.९३ इतके आहे. अनुसूचित जातीतील बहुतांश लोक गावातच राहत असल्याने शेती हा व्यवसाय करतात. त्यांचा उदरनिर्वाह शेतीवरच होत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थेत सर्वात कमी संख्या शिक्षण घेत असलेल्या प्रतिनिधींची दिसते. याचे शेकडा प्रमाण ०.७७ इतके आहे. नोकरी, स्वयंरोजगार करणाऱ्यांची आर्थिक परिस्थिती मध्यम असलेली दिसते. मजूरी करणाऱ्यांची आर्थिक स्थिती हालाकीची दिसते. या तक्त्यावरून असे दिसते की, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील बहुतांश लोकप्रतिनिधींची आर्थिक परिस्थिती बेताची असलेली दिसते.

**तक्ता क्र. ७**

**स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींचे निर्णय प्रक्रियेतील सहभागाचे वर्गीकरण**

| अ. क्र. | उत्तराचे पर्याय | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मत मांडण्याची संधी दिली जाते. | १२६ | ९७.६७ |
| २ | मत मांडण्याची संधी दिली जात नाही | ३ | २.३२ |
| | एकूण | १२९ | १०० |

तक्ता क्र. ७ नुसार अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींना स्थानिक स्वराज्य संस्थेत मत मांडण्याची संधी दिली जाते असे १२६ प्रतिनिधींनी सांगितले आहे. याचे शेकडा प्रमाण ९७.६७ इतके आहे. या प्रवर्गातील लोकप्रतिनिधींमध्ये हक्कांविषयी झालेली जाणीव, जागृती व ग्रामपंचायतीतील पारदर्शक कारभार यामुळे या सदस्यांना मत मांडण्याची संधी मिळताना दिसते. अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील कारभारामध्ये सक्रीय सहभाग वाढल्यामुळे त्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढताना दिसतो.

## समारोप

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थितीतील झालेल्या बदलाचा किंवा दर्जाचा अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार अनुसूचित जातीतील स्त्री आणि पुरूषांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळालेले आहे. या प्रतिनिधींचा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय दर्जा सुधारलेला दिसतो. परंतु त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याकरिता प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

१) स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रतिनिधींचा सामाजिक, शैक्षणिक दर्जा सुधारलेला दिसतो.

२) अनुसूचित जातीअंतर्गत समाजाला प्रतिनिधीत्व मिळालेले दिसते. परंतु काही समाजाची लोकसंख्या कमी आहे, त्यांना कमी प्रतिनिधीत्व दिसते.

३) अनुसूचित जातीच्या प्रतिनिधींचा स्थानिक स्वराज्य संस्थेतील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढताना दिसतो.

## संदर्भ

१) अॅड. के. टी. शिरूरकर, भारताचे संविधान, अशोक ग्रोवर अॅड सन्स, औरंगाबाद.

२) वा. भा. पाटील, पंचायतराज, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.

३) २०११ जनगणना अहवाल.

४) लोकप्रतिनिधींच्या मुलाखती अनुसूची

५) कोल्हापूर गॅझेटियर

❑❑❑